# लिपि-सुधारणा-समिति

## अहवाल

## १९४९

मुंबई :
गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस
१९४९

[Price—Re. 1 As. 11 or 3s.]

# अनुक्रमणिका


१. प्रास्ताविक—

(१) समितीची नेमणूक ... ... ... ... १

(२) कार्यालय ... ... ... ... २

(३) बैठकी ... ... ... ... २

(४) स्वीकृत सभासद ... ... ... ... २

(५) प्रश्नावलि ... ... ... ... २

(६) प्रश्नावलीचीं अुत्तरें ... ... ... ... ३

(७) लिपि-चळवळीचा थोडासा अितिहास ... ... ... ३–५

(८) लिपि सुधारणेबाबत कांहीं मतांचें परीक्षण ... ... ५–७

(९) आंकड्यांविषयीं ... ... ... ... ७

२. ठराव ... ... ... ... ९–१४

३. परिशिष्ट १ (प्रश्नावलि) ... ... ... ... १५–२१

४. परिशिष्ट २ (प्रश्नावलीला अुत्तरें पाठविलेल्या व्यक्तींच्या नांवांची यादी ... २१–३४

५. परिशिष्ट ३ (समितीनें सुचविलेल्या अक्षरांच्या आकृति) ... ... ३५–४५

# लिपि सुधारणा समितीचा अहवाल.

---

मराठी (बालबोध) व गुजराती या दोन लिप्यामध्यें सुधारणा सुचविण्यासाठीं मुंबआी सरकारनें तारीख २४ माहे जून सन १९४९ च्या ठराव क्रमांक ७९११ द्वारें खालील लिपि सुधारणा समिति नेमल्याचें जाहीर केलें:—

**अध्यक्ष :** १. आचार्य काकासाहेब कालेलकर.

**सभासद :** २. श्री. ग. पां. विजापुरे, कऱ्हाड.

३. श्री. य. रा. दाते, पुणें.

४. श्री. केशवराम का. शास्त्री, अहमदाबाद.

५. श्री. किशोरलाल मश्रूवाला, वर्धा.

६. श्री. शिवाजी नरहर भावे, धुळें.

७. श्री. ह. कुं. फिरोदिया, मुंबआी.

८. श्री. बचुभाआी रावत, अहमदाबाद.

९. श्री. धीरजलाल सी. मोदी, मुंबआी.

**संयुक्तमंत्री :** अेल्फिन्स्टन कॉलेज, मुंबआीमधील गुजरातीचे प्रा. का. ब. व्यास व सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज, मुंबआीमधील मराठीचे प्रा. न. र. पारसनीस या दोघांची संयुक्तमंत्री म्हणून नेमणूक करण्यांत आली.

समितीची कालमर्यादा प्रथम तीन महिन्यांची होती. ती पुढें वाढवून पांच महिन्यांची करण्यांत आली.

समितीला पुढीलप्रमाणें कार्यादेश देण्यांत आला होता.

१. मराठी (बालबोध) व गुजराती या दोन्ही लिपींत मुद्रण, टंकलेखन, दूरलेखन, वाचन, लेखन, अित्यादि बाबतींत अधिक सुकरता आणण्यासाठीं कांहीं सुधारणा करणें अिष्ट आहे कां ? व असल्यास त्या सुधारणा शास्त्रशुद्ध लिपीच्या आवश्यक अंगांना अबाधित राखून कोणत्या करावयाच्या ? याचा विचार करणें.

२. सध्यांच्या लिपींचें सुचविलेल्या सुधारणेंत परिवर्तन करण्यासाठीं मध्यंतरी कोणच्या क्रमानें जाणें अिष्ट आहे ? हें सुचविणें.

३. मराठी (बालबोध) व गुजराती या दोन्ही लिपींना शक्य तितक्या जवळ आणण्यासाठीं त्यांचा आवश्यक विकास करणें अिष्ट आहे किंवा नाहीं, याचा विचार करणें.

४. वरील तिन्हीं मुद्यांतून अुत्पन्न होणाऱ्या अितर सर्व आनुषंगिक गोष्टींचा विचार करणें.

## कार्यालय

समितीचें कार्यालय गांधी-स्मारक-संग्रह, टाउन हॉल, मुंबअी, १ या ठिकाणीं चालू करण्यांत आलें. श्री. नटवरलाल कापडिया यांचेकडे कार्यालयाची व्यवस्था सोंपविण्यांत आली. सरकारी ठरावानुसार श्री. लक्ष्मण श्रीधर वाकणकर, बी. एस्.सी. (टेक्.), बनारस, यांची लिपिकार (Artist) म्हणून नेमणूक करण्यांत आली.

## बैठकी

समितीच्या अेकंदर तीन बैठकी झाल्या;

पहिली बैठक: ता. २५ व ता. २६ जुलै, १९४९.

दुसरी बैठक: ता. ११, ता. १२, ता. १३ व ता. १४ आक्टोबर १९४९.

तिसरी बैठक: ता. १६ नोव्हेंबर १९४९.

श्री. मश्रूवाला अेकाहि बैठकीस हजर राहूं शकले नाहींत. पण त्यांनीं वर्धा येथें अध्यक्षांशीं वेळोवेळीं चर्चा करून आणि शेवटीं मान्य झालेल्या ठरावांच्या बाबतींत आपल्या सूचना लेखी पाठवून समितीच्या कार्यांत पूर्णपणें भाग घेतला होता. श्री. भावे पहिल्या अेकाच बैठकीस हजर राहिले. त्यानंतर त्यांनीं स्वतःच्या सूचना लिहून पाठविल्या होत्या. श्री. विजापुरे पहिल्या दोन्ही बैठकीस हजर असल्यामुळें ठराव तयार करण्यांत त्यांचा पूर्ण सहकार होता. श्री. दाते हे फक्त पहिल्या बैठकीस हजर राहूं शकले नाहींत, तेव्हांही त्यांनीं पत्रद्वारें स्वतःच्या सूचना पाठविल्या होत्याच. समितीचे सर्व ठराव सर्वानुमतें संमत झालेले आहेत ही गोष्ट विशेष अुल्लेखनीय आहे.

## स्वीकृत सभासद

समितीला मिळालेल्या अधिकारान्वयें समितीनें (१) महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें व (२) गुजराती साहित्य सभा, मुंबअी, या संस्थांशीं पत्रव्यवहार करून त्यांचे अेकेक प्रतिनिधि पहिल्या बैठकीच्या अन्तीं स्वीकृत करून घेतले. त्यांचा सहकार पुढील दोन्ही बैठकींत समितीला मिळाला. त्यांचीं नांवें :—

१. श्री. वा. दा. गोखले, महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें.

२. श्री. मुनिजिन विजयजी, भारतीय विद्याभुवन, मुंबअी.

## मराठी प्रश्नावलि

सुधारणा कोणत्या दिशेनें करण्याजोग्या आहेत याचें सूचन व्हावें आणि त्यायोगें लोकमत स्पष्ट समजून यावें अशा धोरणानेंच प्रश्नावलि तयार करण्याचें पहिल्या बैठकींत ठरलें व तशी प्रश्नावलि तयार करून ती या प्रश्नाविषयीं आस्था असलेल्या प्रमुख व्यक्तींकडे, संस्थांकडे आणि नियतकालिकांच्या संपादकांकडे पाठविण्यांत आली. (प्रश्नावलि—परिशिष्ट १ पहा.) समितीच्या कार्यालयांतून सुमारें ५०० प्रश्नावलि महाराष्ट्रांत निरनिराळ्या ठिकाणीं पाठविण्यांत आल्या. तसेंच सुमारें ३०० मुंबअी व अुपनगरांत हस्तेंपरहस्तें पाठविण्यांत आल्या.

## प्रश्नावलीचीं अुत्तरें

समितीच्या प्रश्नावलीला जवळजवळ शंभर प्रमुख व्यक्तींकडून अुत्तरें आलीं. (त्यांचीं नांवें परिशिष्ट २ मध्यें आढळून येतील.)

त्याशिवाय महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें, महाराष्ट्र मुद्रण परिषद्, पुणें व पूना प्रेस ओनर्स असोसिअेशन, पुणें, या संस्थांच्यावतीनें त्यांच्या प्रतिनिधींनीं अुत्तरें पाठविलीं.

सर्व सामान्य लोकांच्या माहितीसाठीं आमची प्रश्नावली व अक्षरांचे ठसे (ब्लॉक्स) मुंबअींतील "लोकमान्य" या दैनिकानें छापले होते. प्रश्नावलीला धरून "केसरी", "काळ", "नवयुग", "लोकसत्ता", वगैरे नियतकालिकांमध्यें यासंबंधीं लेख आल्यामुळें लोकमताला चांगलीच चालना मिळाली. दुर्दैवानें याच काळांत अवांतर अेकदोन प्रश्नावर महाराष्ट्र व गुजराथ या दोन्ही प्रदेशांमध्यें मतभेद झाल्यामुळें लिपीच्या वृत्तपत्रीय चर्चेंत देखील त्याचा प्रतिध्वनि उमटला. गुजराती लिपि महाराष्ट्रावर लादली जाणार आहे कीं काय, किंवा मराठी (बालबोध) लिपि गुजराथवर लादण्याचा विचार आहे कीं काय, अशी शंका अुघडपणें व्यक्त करण्यांत आली होती. लोकमताला अनुसरूनच चालणाऱ्या सरकारच्या हातून कोणचीहि सुधारणा "लादली" जाणें शक्य नाहीं या गोष्टीचा टीकाकारांना क्षणभर विसर पडला. पण ही चर्चा फारशी चिघळली नाहीं, ही समाधानाची गोष्ट आहे. खुद्द समितीचें वातावरण पूर्णपणें समंजसपणाचें असल्यामुळें आम्हांला कोणचीच अडचण भासली नाहीं. याबाबतींत पुणें येथील "सह्याद्रि" मासिकाचे संपादक श्री. दि. वि. काळे यांच्या अुत्तरांतील पुढील भाग नमूद करण्याजोगा आहे: "......... या दोन्ही भाषांची अेक लिपि करण्यांत जे दोन मोठ्या समाजांचे निकटीकरण शक्य होणार आहे तेंहि अिष्ट असल्यानें कांहीं तडजोड करण्यास सुविचारी माणसांनीं खळखळ करूं नये असें माझें मत असल्यानेंच माझें कांहीं आग्रह सोडण्यास माझी तयारी आहे."

आमच्या प्रश्नावलीला ज्या ज्या व्यक्तींनीं अभ्यासपूर्वक अुत्तरें पाठविलीं त्यामध्यें या विषयाचा अभ्यास व प्रचार केलेल्यांचा समावेश झालेला आहे. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रांत अनुभव असलेल्या तज्ज्ञांनींहि आपल्या अनुभवाचा फायदा आम्हांस दिला. कांहीं अुत्तरें विद्यालयीन विद्यार्थीकडून आलीं. सर्व अुत्तरांचा अभ्यास करण्यांत येअून त्यांचा मुद्देवारीनें तक्ता तयार करण्यांत आला. अर्थातच त्याचा समितीला ठराव करतांना फार अुपयोग झाला. प्रश्नावलीला आलेल्या अुत्तरांचें स्वरूप अधिकांश प्रगतिपर व आशादायक होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

## लिपि चळवळीचा थोडासा अितिहास

ज्या नागरी कुटुंबांत मराठी (बालबोध) व गुजराती या दोन्ही लिपींचा अंतर्भाव होतो त्या नागरी लिपींत राष्ट्रभाषा हिंदी लिहिली जात असल्यानें तेथें सुधारणा झाली म्हणजे तीच सर्वत्र स्वीकारली जाअील अथवा जावी अशी सूचना करण्यांत आली होती. अशा तऱ्हेचे प्रयत्न पूर्वी झालेले आहेत आणि त्यांत महाराष्ट्र व गुजराथ या दोन्ही प्रांतांनीं भाग घेतलेला

आहे. तेथें ज्या सुधारणा स्वीकारल्या गेल्या त्या जमेस धरूनच पुढील कार्य होत आहे. असें असलें तरी अखिल भारतीय स्वरूपाची समिति नेमून वेअून काम करणें सध्यांच्या परिस्थितींत सोपें नाहीं. अुत्तर प्रदेशाच्या सरकारनें स्वतःपुरतीच अेक नागरी लिपि सुधारणा समिति नेमली आणि तिचें कार्य नुकतेंच पुरें झालें आहे असें कळतें. हिंदीच्या प्रमाणेंच नागरी लिपीचा अुपयोग करणाऱ्या महाराष्ट्र व गुजराथ या प्रांतांच्या सरकारनें लिपी सुधारणेचा प्रश्न मागोमाग हातीं घेणें क्रमप्राप्तच होतें. आणि अनुभव असा आहे कीं, स्वतःच्या स्थानिक सोयी गैरसोयी आणि लोकमताचा विचार त्या त्या प्रांतानें स्वतंत्रपणें केल्यानें सुधारणेला चांगली चालना मिळते. आणि अेका प्रांतानें पुढें पाअूल टाकलें कीं, त्याचा प्रभाव दुसऱ्या प्रांतावर स्वभाविकपणेंच पडतो. महाराष्ट्रांत तर न्यायमूर्ति रानडे यांच्या काळापासून थोरथोर व्यक्तींनीं लिपींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं प्रयत्न केले आहेत. याबाबत महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें, या संस्थेनें लिपि सुधारणा समिति नेमून साहित्यसंमेलनांतून तत्संबंधीं ठराव केले आहेत. महाराष्ट्रांतील कित्येक छापखान्यांनीं लिपि सुधारण्याचा प्रश्न हातीं घेअून व नवे टाअिप पाडून लोकमत अजमावण्याचा प्रयत्न अगदीं प्रथमपासून केला आहे. आणि हल्लीं तर लोकांच्या डोळ्यावर न येतील अशा सुधारणा टाअिपांतच बारीकसारीक फेरफार करून प्रत्यक्ष घडवून आणण्याचें काम कित्येक छापखानेवाल्यांनीं अुत्तम रीतीनें करून दाखविलें आहे. लोकमताला खडबडून जागें करण्याअितकी सुधारणा अंमलांत आणण्याचा प्रयत्न वर्ध्यास श्री. विनोबा भावे यांना आपल्या "लोक नागरी"तूनच चालू केला असून त्या पूर्वीपासून बॅ. सावरकर यांनींहि आपला जोरदार प्रयत्न चालविला आहे.

लिपि सुधारणेबाबत महाराष्ट्रांत जे वाद व ज्या चळवळी झाल्या तशा त्या गुजराथेंत झाल्या नाहींत. परंतु छापखान्यांच्या सुरवातीच्या दिवसांतच गुजराथनें अेक महत्त्वाचें पाअूल पुढें टाकलें व तें म्हणजे अक्षरांवरील शिरोरेखा काढून टाकण्याचें. त्यापूर्वी महाराष्ट्राच्या मोडीप्रमाणेंच गुजराथच्या लिपींत कागदाच्या अेका टोंकापासून ते दुसऱ्या टोंकापर्यंत सरळ रेघ काढून तीवर अक्षरें लटकवून देण्यांत येत असत. शिळा प्रेसवरही अशीं अक्षरें प्रथम-प्रथम काढीत. पण पुढें लोकांना असें वाटलें कीं, ती काढून टाकलीं तरी हरकत नाहीं. अे, अै हीं रूपें म्हणजे गुजराती लिपींतील दुसरी सुधारणा होय. हिंदुस्थानांत अितरत्रहि जुन्या पोथ्यांत हीं रूपें आढळतात. त्याशिवाय नागरी अक्षरांना सुदर वळण देअुन लेखनाच्यादृष्टीनें त्यांना अधिक सुटसुटीत करण्याचें श्रेय गुजरातीला देतां येअील. અ, થ व ષ या अक्षरांचीं रूपें यादृष्टीनें विशेष अुल्लेखनीय आहेत. यापुढचें तिसरें पाअूल म्हणजे गुजरातीचें नागरीकरण. याबाबत सक्रिय आणि व्यापक प्रमाणावर कार्य महात्मा गांधींनीं केलें. आपल्या आत्म-कथेची अेक विशेष व चांगली आवृत्ति त्यांनीं नागरींतच छापविली व तिची किंमत कमी ठेअून नागरीचा प्रचार केला. नागरी लिपींतील आवृत्तीच्या प्रस्तावनेंत त्यांनीं आपण लिपि सुधारणेच्या पक्षाचे आहोंत असेंहि जाहीर केलें आहे. गांधीजींचें दुसरें पाअूल 'अ' ची स्वराखडी लोकप्रिय करण्याबाबत होतें. तिचा अवलंब 'नवजीवन' च्या सर्व हिंदी मराठी व गुजराती पुस्तकांत नागरी लिपि वापरतांना निरपवादपणें करण्यांत येत आहे.

'कुमार' व 'प्रस्थान' या मासिकांच्या कार्यालयांनीं लिपि सुधारणेंच्या चळवळीला जो सक्रिय पाठिंबा दिला आहे त्याचा अुल्लेख येथें केला पाहिजे. कारण त्यांनीं विशेष चर्चा न करतां या कार्याला चालना दिली. तसें पाहिलें तर गुजराती समाजांत नागरी लिपीच्या वापराची प्रवृत्ति फार जुनी आहे. जुन्या सरकारी पाठ्यपुस्तकांत पाठांचीं शीर्षकें व कविता नागरींत असत व त्या वेळचीं कांहीं पुस्तकें तर नागरींतच छापलीं गेलीं आहेत. गुजराती साहित्य परिषदेनें आपल्या अनेक अधिवेशनांतून गुजरातीच्या नागरीकरणाबाबत ठराव करून तिला मान्यता दिली आहे. तात्पर्य, म्हणजे फारशी चळवळ न करतांहि गुजराथनें लोकमताला नागरीचें शिक्षण दिलेलें आहे.

## लिपि सुधारणेबाबत कांहीं मतांचें परीक्षण

कित्येकांचें म्हणणें आहे कीं, लिपींत ज्या सुधारणा करावयाच्या त्या क्रमाक्रमानें न करतां अेकदम करून मोकळें व्हावें. त्यांच्या मतें लिपि सुधारणेंचें काम शस्त्रक्रियेसारखें आहे. तें झपाट्यानें सफाअीदार हातानें झालें तर ज्या कांहीं वेदना व्हावयाच्या त्या अेकदांच होअून पुढें जखम भरून येण्यास त्रास पडणार नाहीं. तत्त्वत: हें खरें असलें तरीं अशा गोष्टीला लोकमत मान्यता द्यावयास तयार नसतें. निदान सरकारला तरी लोकमताच्या फार पुढें जाअून तसें करतां येत नाहीं. अेखाद्या भाषेला नवीनच लिपि चालविणें हल्लींच्या काळीं शक्य नाहीं. आणि लिपि सुधारणा ही गोष्टच अशी आहे कीं, प्रभावी व्यक्तिमत्त्वावाचून समाजांत तिचा प्रचार होअून ती ग्राह्य होअूं शकत नाहीं. सुधारणेला अनुकूल असा वर्ग तयार केल्यावाचून ती अंमलांत आणणें दुरापास्त होतें. अेकदां लोकमत जवळजवळ तयार झालें म्हणजे सरकारच्या पाठिंब्यानें सुधारणा सार्वत्रिक करणें सोपें जातें. म्हणूनच सरकारनें आम्हांला दिलेल्या स्वत:च्या कार्यादेशांत सुधारणा कोणच्या क्रमानें कराव्यात हेंहि सुचविण्याची जबाबदारी आम्हांवर सोंपविली असावी.

यांत्रिक प्रगतीच्या युगांत (म्हणजेच मुद्रण, टंकलेखन, दूरलेखन, या बाबतींत) आपल्या लिपि मागें पडूं नयेत आणि साक्षरता प्रसाराला वेग मिळावा या दोन्हीं दृष्टीनें कमींत कमी ज्या सुधारणा करणें अत्यावश्यक आहे तेवढ्यांचाच विचार आम्हीं केला आहे. दूरलेखना (टेलीप्रिंटरी) विषयींची योजना सुचविण्याचें आमचें काम होतें. पण पुरेसा अवधि नसल्यानें व या सुधारणेचें क्षेत्र निराळें असल्यानें तिचा आम्हीं तूर्त विचार केला नाहीं.

मतभेदांनीं व पक्षोपपक्षांनीं विदीर्ण झालेल्या समाजांत लिपीच्या बाबतींत आणखी अेक पक्ष अुभा करणें अिष्ट वाटत नाहीं. जनतेच्या प्रगतिसाठीं लिपि सुधारणेची खास गरज नसती तर आज हा प्रश्न आम्हीं हातांत घेतलाच नसता. स्वराज्य प्राप्तीमुळें आपणावर लोकजागृतीची जबाबदारी येअून पडली आहे. आज अिंग्रजी काढून तिच्या जागीं देशी भाषांतून आपला राज्य-कारभार चालवावयाचा आहे. म्हणून यावेळीं मुद्रणाच्यादृष्टीनें अिंग्रजी लिपीच्या मुद्रणांत जी सुकरता आहे ती देशी लिप्यांमध्यें आणल्यावाचून गत्यंतर नाहीं. तसेंच साक्षरता प्रसारालाहि यानें मदत होअील या दृष्टीनें आम्हीं अत्यंत आवश्यक अेवढ्याच सुधारणा सुचविल्या आहेत. मुद्रणाबरोबर टंकलेखनाचाहि प्रश्न आम्हीं विचारांत घेतला आहे.

लिपिग्रहणविषयक मानसशास्त्राचे सिद्धांताचा साक्षरता प्रसाराशीं संबंध येतो, तसाच शिक्षण शास्त्राचाहि येतो. म्हणून ध्वनिशास्त्राशिवाय वरील दोन्ही शास्त्रांच्या दृष्टीनें लिपि सुधारणेच्या प्रश्नाचा विचार करावा लागतो. आपल्याकडे लिपीचा अुगम अतिशय प्राचीन असून तो दैवी मानला जातो. तरीपण अजूनहि आपल्या समाजावरील निरक्षरतेचा कलंक दूर झाला नाहीं, तेव्हां तो दूर करण्यासाठीं आपण कटिबद्ध झालेंच पाहिजे. लिपि सुधारणेचा शास्त्रीयदृष्टया विचार करून कित्येकांनीं आमूलाग्र सूचना केल्या आहेत, त्या अुपयुक्तहि आहेत. पण त्या स्वीकारल्यास लिपीचें स्वरूप अितकें कांहीं बदलून जाअील कीं, सर्वच समाजाला नव्यानें लिपि शिकून घेण्याची पाळी यावयाची. म्हणून अशा प्रयत्नांविषयीं आदर बाळगून देखील आम्हीं त्यांचा स्वीकार करूं शकलों नाहीं.

लिपि सुधारणांचा विरोध करणाऱ्या कित्येक वैय्याकरणांची भूमिका सुसंगत नाहीं. अुदाहरणार्थ अ च्या बाराखडीपैकीं, इ, उ, ए च्या, अि, अु, अे या स्वरूपांना विरोध करणारे ओ व औ या रूपांचें समर्पक समाधान कधींच करूं शकत नाहींत, व तरीहि तीच जुनीं रूपें चालू असावींत असा त्यांचा आग्रह असतो. जुन्या पोथ्यांत व मोडींत अे, अै, अशीं रूपें आढळून येतात, तींहि ते दृष्टीआड करतात. अि, अु, हीं रूपें देखील प्राचीन ग्रंथांत कोठें कोठें सांपडतात. दुसऱ्या बाजूनें 'अ' ची बाराखडी हीच शास्त्रशुद्ध आहे, असें प्रतिपादन करणारे कांहीं आधुनिक वैय्याकरणहि आहेत.

मुद्रणांत जे सिद्धांत महत्त्वाचे आहेत ते असे:—

१. हल्लींच्या तीन मजली जुळणीवरून अेक मजलीवर येणें.

२. ध्वनीच्या संज्ञा अुच्चार क्रमानुसार लिहिणें.

३. निरनिराळ्या ध्वनींच्या बाबतींत जेवढें अुच्चारांत साम्य असेल तेवढें आकृतींतहि व्यक्त करून लिपीची शास्त्रीयता किंवा वैज्ञानिकता वाढविणें अु. प, फ, ट, ठ, या दोन जोड्यांत महाप्राणाची खूण (ा) स्पष्ट दिसते. तीच सार्वत्रिक करणें.

पण वर दर्शविल्याप्रमाणें सर्व महाप्राण अक्षरांत अशाच तऱ्हेची योजना असावी असें म्हटलें तर त्याला आज जनता तयार होणार नाहीं. दूरलेखना (टेलीप्रिंटरी) साठीं ज्यावेळीं महाप्राण अक्षरांत फेरफार करावाच लागेल तेव्हां ही सुधारणा लोकांना समजून तिचें महत्त्व ध्यानांत येणार आहे. त्याचवेळीं म्ह, न्ह, ण्ह, या महाप्राणयुक्त ध्वनींची सध्यांची युक्ताक्षरें जाअून त्यांना स्वतंत्र चिन्हें मिळतील. अु. म्य, न्य, ण्य, ख्य, ब्य, त्य, थ्य, वगैरे युक्ताक्षरांचाहि प्रश्न या वर्गांतलाच आहे. अनेक ठिकाणीं मुळांत हीं युक्ताक्षरेंच नसतात. त्यांत कांहीं अुच्चाराचें तालव्यीकरण असतें. तेव्हां त्याचे युक्ताक्षर न बनवतां नव्या चिन्हांतीं या 'य' श्रुतीचे लेखन व्हावयास हवें. पण आज तसें लिहिण्याची सोय चालू लिपींत नाहीं.

विनोबा भाव्यांनीं मराठीच्या सोयीसाठीं कान्याला खालीं गांठ देअून या-श्रुति तयार केली आहे. या नवीन खुणेनें "करण्यांत" वगैरे शब्दांच्या बाबतींतील जोडाक्षरांचा भ्रम निघून जातो.

## आंकडे

लिपिबरोबर अंकांचाहि प्रश्न निगडित आहे. नागरी अंकांचीं रूपें सर्वत्र अेकसारखी असावीं अशी सूचना आम्हीं केली आहे व तशी रूपेंहि सुचविलीं आहेत.

याबरोबरच अिंग्रजी आंकडे वापरावेत ही विज्ञानपरिषदेची शिफारसहि आठवणींत ठेवावी लागेल. समितीतर्फे यावर कांहीं निश्चित अभिप्राय द्यावा असें आवश्यक नसल्यानें आम्हीं जाणूनबुजूनच या नादांत पडलों नाहीं. हा प्रश्न आपणांस नवा आहे व त्या वादाच्या सर्व बाजू स्पष्ट झाल्याशिवाय आज निर्णय देणें वाअीचें होअील.

अिंग्रजी आंकड्यांना 'आंतरराष्ट्रीय भारतीय आंकडे' असें नांव दिलें गेलें आहे, त्यामागें प्रचाराची दृष्टि दिसते. आंकड्यांचा शोध भारतीय आहे. जगानें आमच्याकडूनच आंकडे घेतले आहेत तेव्हां आतां भारतीयांनीं आपल्या आंकड्यांचीच अिंग्रजी आवृत्ति स्वीकारून जागतिक अेकतेंत अेक पाअूल पुढें टाकावें अशी शिफारस करण्यांत येत आहे.

आम्हीं केलेल्या शिफारशी ठरावांच्या रूपानें पुढें देत आहोंत.

आपापल्या कामांत व्यग्र असलेल्या सभासदांच्या समितीचें बरेचसें काम समितीच्या मंत्र्यांनाच करावें लागतें. प्रत्यक्ष बैठकींची व्यवस्था करण्याखेरीज अितरवेळींहि त्यांना कामें करावीं लागतात. श्री. व्यास व श्री. पारसनीस या अुभय मंत्र्यांनीं आपलीं कामें फार काळजीनें व अुत्साहानें केलीं आहेत. लिपिसुधारणेचा विषय त्यांना नवा होता. तरीहि त्यांनीं याविषयाचें अध्ययन करून समितीच्या कामांत आवडीनें व अुत्साहानें भाग घेतला, व सर्व कामें वेळेवर चोखरीतीनें अुरकलीं. या सर्व सेवेबद्दल समिति या अुभय मंत्र्यांचे आभार मानीत आहे.

(सही) **काका कालेलकर.**

# सर्वानुमतें मान्य झालेले ठराव

**ठराव १.**—शिरोरेखा नागरीचें आवश्यक अंग आहेच असें नाहीं. पण हिचा प्रचार पुष्कळ ठिकाणीं आहे. कित्येक लोक लिहितांना शिरोरेखा सोडून लिहितात, आणि गुजरातीनें आपल्या छापील वळणांत शिरोरेखा सोडून दिली आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, नागरी लिपि शिरोरेखासहित व शिरोरेखारहित अशा दोन्हीं प्रकारांनीं संभवते. असें दिसतें कीं, या दोन्ही तऱ्हा पुष्कळ काळ चालणार आहेत. याकरितां नागरी अक्षरांचें असें वळण पसंत करावें कीं, शिरोरेखा असो किंवा नसो कोणत्याहि प्रकारें संशय अुत्पन्न होअूं नये, मात्रादि लावतांना अडचण पडूं नये, आणि त्याचप्रमाणें लोकांच्या आवडीला विरोध येअूं नये. अशा रीतीनें दोन्ही प्रकार वापरण्याची प्रथा चालावी.

मराठीमध्यें मुख्य मजकूर शिरोरेखासहित छापण्याचा रिवाज आहे. विशेष मजकुरासाठीं म्हणजे अवतरणें, महत्त्वाचे शब्द, मथळे, वगैरे शिरोरेखारहित छापावा म्हणजे वाचकाना या नवीन पद्धतीचा अथवा विकल्पाचा परिचय होअील. तसेंच गुजरातीमध्यें मुख्य मजकूर शिरोरेखारहित छापण्याचा प्रघात आहेच. पण विशेष मजकुरासाठीं म्हणजे अवतरणें, मथळे, महत्त्वाचे शब्द वगैरे मजकुरासाठीं शिरोरेखायुक्त टाअिप वापरावा म्हणजे वाचकांना विकल्पाचा परिचय होअील, अशी आमची शिफारस आहे.

**ठराव २.**—सध्यां शिरोरेखासहित व शिरोरेखारहित अशीं नागरीचीं जीं दोन वळणें चालू आहेत, त्यांच्याअैवजीं सेरिफवालीं (अल्पशिरोरेखायुक्त) अक्षरें पसंत होण्याचा संभव नाहीं, हें स्पष्ट दिसतें. पण विकल्प म्हणून वापरण्यासाठीं सेरिफवालीं अक्षरें दोन्ही वळणांना जवळचीं असल्यामुळें तीं पसंत होण्याचा संभव आहे. निदान अक्षरांच्या शोभेचा अेक नवीन प्रकार म्हणून हीं वापरलीं जाण्याचा संभव दिसतो. आणि जर सेरिफवालीं अक्षरें टाअिपरायटरवर बनविण्यांत अधिक सोयीचीं ठरलीं तर तोहि अेक मुद्दा सेरिफवाल्या अक्षरांच्या पक्षाला मजबुती आणील.

यासाठीं मुद्रकांना व प्रकाशकांना तीं सेरिफवालीं अक्षरें (आकृति २ परिशिष्ट १) किंवा (आकृति ३ परिशिष्ट ३ पहा) त्यांनीं वापरून पाहावींत अशी आमची शिफारस आहे.

हीहि गोष्ट संभवते कीं, शिरोरेखा सामान्यपणें न वापरणाऱ्यांना (गुजराती) विकल्परूपानें शिरोरेखा वापरण्यापेक्षां सेरिफवालीं अक्षरें वापरणें अधिक आवडेल, आणि त्याचप्रमाणें नेहमीं शिरोरेखा वापरणाऱ्या लोकांना (मराठी) विकल्प म्हणून शिरोरेखेला अजिबात फाटा देण्यापेक्षां सेरिफवालीं अक्षरें पसंत होण्याचा संभव आहे. अशा रीतीनें शिरोरेखासहित व शिरोरेखारहित अशीं दोन्हीं वळणें अेकमेकांना विकल्प किंवा पर्याय न बनतां सेरिफवालीं अक्षरें अुभयतांचा विकल्प बनतील. आणि असें झालें तर कोणाचीहि हानि नाहीं.

**ठराव ३.**—(अ) नागरीच्या घ आणि ध मध्यें तसेंच म आणि भ मध्यें संशय न राहावा म्हणून ध आणि भ या दोन्हीं अक्षरांच्या प्रारंभीं अुभट पोकळ गांठ यावी अशी आमची शिफारस आहे. [आकृति १ परिशिष्ट ३]

(ब) बाळबोध 'ल' च्या शेवटीं काना अथवा पाद नसल्यामुळें हें रूप अमान्य करून त्यांअैवजीं हिंदीचें पादयुक्त रूप घ्यावें असे ठराव हिंदी व मराठी साहित्यसंमेलनांनीं अनेक वेळां अेकमतानें संमत केले आहेत. म्हणून आपणदेखील तेंच पादयुक्त रूप स्वीकारावें अशी आमची शिफारस आहे. सध्यां 'ल' चें गुजराती वळण जें चालू आहे तें तसेंच विकल्पानें चालू राहाण्यास हरकत नाहीं. [आकृति १ परिशिष्ट ३]

**ठराव ४.**—सध्यां नागरी 'ख' चें जें रूप आहे तें बऱ्याच लोकांना पसंत नाहीं. त्याचें स्वरूप काय असावें याविषयीं ज्या अनेक सूचना आल्या त्या सर्वांचा विचार करून व मोडी, गुजराती व कैथी 'ख' च्या आकृतींचा विचार करून सर्वानुमतें खालील रूप पसंत झालें आहे, व त्याचा वापर व्हावा अशी आमची शिफारस आहे.

ख [आकृति १ परिशिष्ट ३]

**ठराव ५.**—नागरी जोडाक्षरें लिहितांना त्याचप्रमाणें बाराखडी बनवितांना ध्वनिचिन्हें अेकाखालीं अेक न येतां अुच्चारक्रमानुसार अेकापुढें अेक आल्यानें लेखन शास्त्रशुद्ध होतें, तसेंच साक्षरताप्रसारालाहि सोयीचें होतें; जोडाक्षरांतील अवयवाविषयीं संदेह अुरत नाहीं व मुद्रण, टंकलेखन व दूरलेखन अित्यादींतील यांत्रिक सोयीहि साधतात. यासाठीं जोडाक्षरें लिहिण्याची पद्धति अुच्चारक्रमानुसारी असावी हें अिष्ट आहे. म्हणून जोडाक्षरादींचीं रूपें या पद्धतीनें लिहावींत अशी आमची शिफारस आहे. (अुदा. रक्त-रक्त, शुक्ल-शुक्ल, क्रम-क्रम).

ही सुधारणा जरी तावडतोब सर्वत्र अंमलांत आणतां आली नाहीं तरी निदान पाठ्यपुस्तकें, बालसाहित्य व साक्षरतासाहित्य यांत ही सुधारणा तत्काल सुरू करावी अशी आमची शिफारस आहे.

**ठराव ६.**—जोडाक्षरामध्यें 'र' चीं अनेक रूपें सध्यां प्रचलित आहेत. त्यांपैकीं रेफ अुच्चाराप्रमाणें योग्य ठिकाणीं येत नाहीं. अितर जोडाक्षरांत देखील पूर्णाक्षर कोणचें व अर्धाक्षर कोणचें याविषयीं भ्रम राहातो. आणि द्र सारख्या जोडाक्षरांतील खालचें चिन्ह ^ छापतांना सरकतें किंवा अुडून जातें. या सर्व अडचणी टाळण्यासाठीं 'र' चें अेकच रूप अुच्चारानुसार लिहिणे सर्वतऱ्हेनें अिष्ट आहे.

प्रश्नावलींत सुचविलेला अर्धा (र) -र्- रेफेच्या अैवजीं न लिहितां पायमोड (र्) लिहिणें शास्त्रशुद्ध असलें तरी लिहितांना अगर छापतांना र् चें पायमोड चिन्ह राहून गेल्यास लेखन व वाचन अशुद्ध होण्याचा संभव असल्यामुळें पायमोड 'र्' ची शिफारस आम्हीं करूं शकत नाहीं. त्याअैवजीं 'सुऱ्या' किंवा 'ऱ्हास' यांमध्यें जे 'र' चें अर्धचंद्राकार (˘) रूप प्रचलित आहे तें रेफेच्या अैवजीं अुच्चारानुसार योग्य ठिकाणीं वापरावें अशी आमची शिफारस आहे.

कांहीं कांहीं शब्दांत मराठी व संस्कृत शब्दांतील भेद दाखविण्यासाठीं रेफ आणि वरील अर्धचंद्राकृति चिन्ह हीं दोन्हीं वापरण्याची सोय आहे. उदा. सूर्यांत व सुर्‍यांत यांच्या अुच्चारांतील भेद संदर्भानें ओळखतां येणें शक्य आहे. (जसें :—पुण्यास व पुण्यास ; काव्यास काव्यास ; दिव्यांत व दिव्यांत ) म्हणून रेफचें चिन्ह पाहिजेच असें नाहीं. तरीपण अुच्चारभेद दाखवावयाचा असल्यास निराघात जोडाक्षरामध्यें पाअुण (य) वापरावा ( जसें—सुर्‍यांत ) व साघात जोडाक्षरामध्यें पूर्ण (य) वापरावा. ( जसें :—सूर्‍यांत )

**ठराव ७.**—सर्व लेखन अुच्चारानुसारी व्हावें या नियमाचा विचार करतां ऱ्हस्व 'इ' चें सध्यांच चिन्ह व स्थान अपवादरूप दिसतें. पण तें अितकें रूढ झालें आहे कीं, यांत फरक करणें अेकाअेकीं मान्य होणार नाहीं. म्हणून याविषयीं लोकमत तयार करणें आवश्यक आहे.

जर 'इ' चें चिन्ह अुच्चाराप्रमाणें व्यंजनापुढें ठेवावयाचें तर त्याचें स्वरूप कसें असावें याबाबत बराच मतभेद दिसून आला. याविषयीं अुत्तर प्रदेश लिपिसुधारणा समितीनें मान्य केलेलें रूप आणि आमच्या समितींतील चर्चेच्या शेवटीं ज्याविषयीं अनुकूलता दिसून आली तें रूप जवळ येतें. तेव्हां ऱ्हस्व 'इ' चें चिन्ह अक्षरानंतर लिहिण्यासाठीं खालीलप्रमाणें सुचवितों.

इ=अि ; कि=कि. [ आकृति २ परिशिष्ट ३. ]

**ठराव ८.**—मराठी व गुजराती यांचें कंपोजिंग आणि अिंग्रजीचें कंपोजिंग यांची तुलना करतां असें स्पष्ट दिसून येतें कीं, अिंग्रजीचीं सगळीं अक्षरें अेकाच मजल्यांत अेकापुढें अेक येत असल्यामुळें खिळेजुळवणी अतिशय सोपी जाते, खर्च कमी येतो, अक्षरें सरकण्याची किंवा पडून जाण्याची भीति नसते, पानांत मजकूर अधिक सामावूं शकतो आणि अुच्चारक्रम स्पष्ट दिसून येतो. या सर्व सोयींमुळेंच कित्येक लोक आपल्या लिपीच्याअैवजीं अिंग्रजीची रोमन लिपि आपल्या भाषांसाठीं वापरावी अशी सूचना करतात. पण अिंग्रजी लिपींतील हे सर्व गुण नागरी लिपीच्या कंपोजिंगमध्यें आणणें मुळींच कठिण नाहीं. थोड्याशा फेरबदलानें हल्लींचीं चिन्हें अेकापुढें अेक आणणें शक्य आहे. पण हल्लींच्या तिमजली जुळवणीअैवजीं अेकमजली जुळवणीकडे जाण्याची कदाचित् लोकांची तयारी होणार नाहीं. यासाठीं सध्या खालीं लिहिण्यांत येणारीं उ, ऊ आणि ऋ यांचीं चिन्हें अक्षरांच्याखालीं न लिहितां अक्षरांच्यापुढें लिहिण्याची व्यवस्था केली तर जुळणी दुमजली होअील अेव्हढी सुधारणा प्रचारांत सुलभतेनें येणें शक्य आहे.

महाराष्ट्रांत कित्येकांनीं अखंड टाअिप तयार केल्यामुळें तिमजली जुळणीचा प्रश्न जवळ-जवळ सुटला आहे. वरील सूचना अंमलांत आणली तर मराठीचें कंपोजिंग त्याहूनहि अधिक सोपें होअील. याबाबतींत महाराष्ट्रांत जें लोकमत अनुकूल आहे त्याला जर सरकारी पाठिंबा मिळाला तर अेव्हढी सुधारणा लोकांच्या सहज पचनीं पडेल.

गुजरातीच्या बाबतींत हेंच धोरण अंमलांत आणतां यावयाचें नाहीं तेथें याबाबतींत चर्चा किंवा अुहापोह अजून व्हावयाचा आहे. उ, ऊ आणि ऋ यांचीं चिन्हें अक्षरांच्या पुढें आल्यानें त्या चिन्हांवरील जागा मोकळी दिसून लिखाण कांहींसें ओकेंओकें वाटतें. अदा. (ય, ય, ય). मराठींत शिरोरेखा येत असल्यानें ही अडचण आपोआप दूर होते. (य, य, य).

म्हणून आमची अशी सूचना आहे कीं, याबाबतींत समितीचा ठराव जनतेपुढें मांडण्या-खेरीज सरकारनें गुजरातीच्या बाबतींत विशेष कांहीं करूं नये. ज्यांना सुधारणा करण्याचा अुत्साह असेल त्यांनीं प्रत्यक्ष प्रयोग करून लोकमत अनुकूल करून घेतल्यानेंच प्रगति होअूं शकेल. त्यांच्या सोयीसाठीं वरील तिन्हीं चिन्हें अक्षरांपुढें कशी येअूं शकतील हें आम्हीं आकृति ७ परिशिष्ट १ किंवा [ आकृति २ परिशिष्ट ३ ] मध्यें खालीं दाखविलें आहे.

हीं तिन्हीं चिन्हें जुन्या पद्धतप्रमाणें अक्षरांच्या खालीं पाहाण्याची लोकांना संवय आहे. तिच्या संतोषासाठीं आणि घाअीनें वाचतांना तीं डोळ्यांत चटकन् भरावींत यासाठीं हीं चिन्हें अक्षरांच्यापुढें घेतलीं तरी अक्षरांच्या खालच्या पातळीच्या एक पॉअिंटखालीं आणावींत अशीहि आमची व्यावहारिक सूचना आहे.

ए, ऐ, ओ, औच्या मात्रा व अनुस्वार इत्यादि चिन्हें देखील अक्षरांच्या पुढें व जरा वर घेण्यासंबंधानें लोकमत साऱ्या भारतभर तयार होअूं लागलें आहे. अुत्तर प्रदेश सरकारनें नेमलेल्या समितीनें तशा प्रकारची सूचना स्वीकारल्याचें समजतें. आपला आदर्श देखील अेकमजली कंपोजिंगकडे जावयाचा आहे. पण अेकदम सुधारणा केल्यास लोकांना अडचण वाटेल, म्हणूनच दुमजली सुधारणेची पायरी सुचविली आहे. या पायऱ्या किती वेगानें चढा-वयाच्या हें लोकमत किती लवकर तयार होतें याचवर अवलंबून आहे. छपाअीच्या क्षेत्रांत आधुनिक अद्यतन यंत्रांचा अुपयोग झपाट्यानें होत असल्यामुळें या सुधारणेला फार काळ लागूं नये असें आम्हांस वाटतें. [ आकृति २ परिशिष्ट ३ ]

**ठराव ९.**—ज्या अक्षरांच्या शेवटीं काना नसतो व ज्यांना आम्ही 'ट' गटाचीं अक्षरें म्हणतों, त्यांच्याबरोबर जीं जोडाक्षरें करावयाचीं तीं आकृति ८ परिशिष्ट १ मध्यें दाखविल्याप्रमाणें (-) जोडचिन्हानें जोडावींत. (जसें:—विठ-ठल, सुट-टी) पण जेव्हां या जोडाक्षरांत पुढील अक्षर 'य' असेल तेव्हां पाअूण य (अुदा० विठ्या) हें चिन्ह वापरतां येअील. जोडचिन्ह लावण्याची आवश्यकता नाहीं. (अुदा० विठ-या) अथवा असें म्हणतां येअील कीं, जोडचिन्ह पहिल्या अक्षरांऐवजीं दुसऱ्या अक्षरास लागलें आहे.

बालबोध लिपीच्या 'छ' प्रमाणें हिंदी नागरीच्या 'छ' ला अर्धा काना नसतो. हा अर्धा काना किंवा शेंडी जर काढली तर तें (छ) 'छ' चें अर्धरूप तयार होईल. 'ळ' च्या बाबतींत तेंच समजावें. (ळ).

गुजराती किंवा नागरी अक्षरामध्यें 'छ' ला शेंडी नसते म्हणून त्याचें अर्धरूप करण्यासाठीं 'छ' ची शेवटची गांठ पुढें आडवी खेंचून किंवा वर सुचविलेलें जोडचिन्ह लावून करावें. (अुदा.—'छ' 'छ')।

**ठराव १०.**—आकृति १ परिशिष्ट १ मध्यें नागरी अक्षरांचीं जीं वळणें दिलीं आहेत आणि रुंदीचें जें प्रमाण ठरविलें आहे तेंच वापरलें पाहिजे असा आग्रह नाहीं. पण टाअिपरायटरमध्यें अक्षरांची रुंदी जवळजवळ सारखीच असणें अिष्ट असतें. तो नियम संभाळून नागरी अक्षरांचें सौंदर्य अबाधित ठेवण्याचा हा प्रयत्न आहे, यादृष्टीनें या अक्षरांकडे पाहावयाचें आहे. या अक्षरापैकीं 'ण' मध्यें जी हिंदी गुजराती प्रकारची सुधारणा केली आहे तिची आवश्यता नाहीं, असें सर्वानुमतें ठरलें. आकृति १ मध्यें 'ख' च्या आकृतीत सर्वानुमतें जो थोडासा फरक केला आहे तोच मात्र मान्य करावा. (ख). [आकृति १ परिशिष्ट ३]

**ठराव ११.**—साक्षरताप्रसाराच्या दृष्टीनें आणि व्यंजनाच्या बाराखडीशीं साम्य दर्शविण्यासाठीं स्वरांचीं जीं रूपें सुचविलीं आहेत त्यांपैकीं अ, आ, अे, अै, ओ, औ, अं, अः, हीं सर्व मोडीला व गुजरातीला परिचित व मान्य आहेत. ज्या न्यायानें अे, अै, ओ, औ हीं रूपें मान्य आहेत त्याच न्यायानें अि, अी, अु, अू, अृ, अॄ, हीं नवीं रूपें मान्य करण्यास हरकत नाहीं. असा पूर्ण विचार करून आम्हीं ज्या रूपांना स्वराखडी म्हणून नांव देतों त्या रूपांचा स्वीकार करावा अशी शिफारस करतों. पण इ, ई, उ, ऊ बाबत अजून गुजराथमध्यें लोकमत तयार झालेलें नाहीं, म्हणून हीं रूपें त्वरितच अंमलात यावींत अशी शिफारस आम्हीं करूं शकत नाहीं. ज्यांना हीं रूपें मान्य आहेत त्यांनीं तीं वापरून लोकमत तयार करण्यास मदत करावी हाच सध्यां व्यवहार्य मार्ग आहे. महाराष्ट्रांत या स्वराखडीविषयीं लोकमत परिपक्व आहे तेव्हां तेथें तर हीं रूपें ताबडतोब पूर्णपणें अंमलांत यावींत अशी शिफारस आम्हीं निःशंकपणें करतों. 'अ' चीं वळणें आकृति ५ (परिशिष्ट १) किंवा [आकृति २ परिशिष्ट ३] प्रमाणें असावींत असें सर्वानुमतें ठरलें.

**ठराव १२.**—नुखत्याचा उपयोग:—च, ज, झ, वगैरे मराठींतील रूढ दन्ततालव्य अुच्चार लेखनांत अथवा मुद्रणात वेगळे दाखविण्याचा प्रघात नाहीं. परंतु तो जर दाखवयाचा असेल तर हिंदीमध्यें ज्याप्रमाणें अक्षराच्याखालीं टिंब (नुखता किंवा अधोबिंदु) देअून अुच्चारभेद दाखवितात त्याप्रमाणें पण अक्षराखालीं टिंब न देतां अक्षराच्यापूर्वी पण तितकेंच खालीं टिंब देऊन दर्शविणें शक्य आहे अशी सूचना हिंदींत झालेली आहे तीच आम्हीं पसंत करतों.

र्‍हस्व ए व दीर्घ ए वगैरे द्राविडी भाषांतील रूढ अुच्चारभेद देखील नागरींत दाखवितां आले पाहिजेत. त्याची व्यवस्था देखील सुचविली गेली आहे. पण अुच्चारभेदाच्या विस्तारांत शिरण्याची आज आवश्यकता नाहीं असें आमचें मत आहे. म्हणून त्याविषयीं आम्हीं विशेष चर्चा केली नाहीं.

**ठराव १२.**—नागरी आंकड्यांच्या बाबतींत सर्वत्र अेकरूपता असावी हें तत्त्व सर्वत्र मान्य आहे. तरीहि गुजराती ५ आणि मराठी ५ यांच्या आकृतींसंबंधानें विकल्प ठेवावा लागेल असें दिसतें. गुजरातीच्या जुन्या ६ ची आकृति आणि बालबोधींतील ५ ची आकृति यांच्यांत बरेंच साम्य असल्यामुळें गुजरातीचा चालू ५ च त्या लिपींत चालू ठेवणें अिष्ट दिसतें. किंवा मराठीनें गुजरातीचा ५ घेतला तरी हरकत नाहीं. हिंदीला तें रूप बरेंच जवळचें आहे. हिंदी पांचमध्यें गुजराती पांचला एक शेपूट जोडलेलें असतें (अुदा. ५-) तीन आणि सहा (३, ६) या आंकड्यांच्या शेवटीं गांठ देण्याची आवश्यकता नाहीं. बालबोध अेकचा बाक लिहितांना कांहींसा पुढें झुकत असल्यामुळें (१) तो सात असावा कीं काय अशी भ्रांति होते. तसें न व्हावें म्हणून अेक अगदीं (१) सरळ लिहावा वाटल्यास त्याचा शेवटचा भाग पुढें नेण्यास हरकत नाहीं जसें (१). नअूचा आंकडा अुभट (९) न घेतां थोडा आडवा घेतलेला चांगला (९).

(सही) **काका कालेलकर,**
(अध्यक्ष)

# परिशिष्ट १
# बालबोध व गुजराती लिपि सुधारण्यासंबंधीं प्रश्नावलि

संस्कृत कुटुंबांतील भाषांसाठीं अेकच लिपि अर्थात् नागरी वापरल्यास सर्व प्रान्तीय भाषांचें अध्ययन व्यापक प्रमाणावर होअूं शकेल. राष्ट्रभाषेसाठीं नागरी लिपि सर्वांनाच शिकावी लागणार आहे. अशा स्थितींत प्रान्तीय भाषांसाठीं देखील नागरी लिपि वापरली गेली तर शिकणाऱ्यांवरील लिपीच्या अभ्यासाचें ओझें कमी होअील आणि निरनिराळ्या प्रांतांतील लोकांना विचारविनिमय करणें बरेंच सोपें होअील. या सर्व गोष्टींचा विचार करून नागरी लिपीचा प्रचार वाढविण्याचे प्रयत्न होत आहेत.

आपल्या प्रान्तांत मराठीसाठीं नागरी लिपीच 'बालबोध' या नांवानें वापरली जाते. गुजराती भाषेची लिपि बहुतांशीं नागरी अक्षरेंच वापरते. त्या अक्षरांचें वळण मात्र कांहींसें निराळें आहे. ज्या थोड्या अक्षरांत फरक आहे तीं अक्षरें बदलून किंवा सुधारून त्यांच्या जागीं नागरी अक्षरें घेतलीं आणि त्यांना गुजराती लिपीला अनुकूल असें वळण दिलें म्हणजे गुजराती लिपि देखील अतिशय थोड्या परिश्रमानें पूर्णपणें नागरी लिपि होअूं शकते.

असें केल्यानें मराठी आणि गुजराती या दोन्ही भाषांची लिपि एकच होअूं शकेल. फरक मात्र अक्षरांच्या वळणाच्या अभिरुचीचाच राहील. पण त्यामुळें वाचण्याला कोणतीच अडचण पडणार नाहीं.

साक्षरताप्रसाराच्या दृष्टीनें मागासलेल्या लोकांना अक्षरबोध सोपा व्हावा; मुद्रणाच्या बाबतींत ज्या अडचणी आहेत त्यांचा विचार करून लिपींत क्रांति न करतां थोड्याफार फेरफारानें आवश्यक सोयी साधाव्या या दिशेनें आपल्याला प्रयत्न करावयाचा आहे.

याबरोबरच मुद्रालेखन (टाअिपराअिटिंग), पंक्तिमुद्रण (लायनो टाअिप), यांचीं यंत्रें तयार करतांना आणि वापरतांना ज्या अडचणी येतात त्यांचा विचार करून त्या दृष्टीनें लिपींत कमींतकमी कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत हेंहि सुचविण्यांचें काम आमच्या समितीचें आहे.

असें करत असतांना गुजराती आणि बालबोध या दोन्ही लिपि जवळ जवळ येतील; खरोखर पाहतां अेकच नागरी लिपीची बालबोध आणि गुजराती अशीं दोन वळणें तयार होतील. सौंदर्याच्या किंवा सोयीच्या दृष्टीनें वापरणाऱ्याच्या अभिरुचीप्रमाणें दोन्हीं वळणें दोन्ही भाषांच्या लोकांना वाटल्यास वापरतां येतील.

नागरी लिपीमध्यें ज्या अत्यंत आवश्यक अशा कमींतकमी सुधारणा सुचविल्या जातील त्या देखील अेकदम अंमलांत न आणतां क्रमाक्रमानें अंमलांत आणल्या तर लोकांना त्यांचा स्वीकार करणें सोपें जाअील. यासाठीं तावडतोब कोणकोणत्या सुधारणा अंमलांत

आणावयाच्या व बाकीच्या सुधारणा कोणच्या क्रमानें आणावयाच्या हेंहि आम्हांला सुचवावयाचें आहे.

याखेरीज टेलिप्रिंटरी अर्थात् दूरलेखनाच्या दृष्टीनें लिपींत काय काय सुधारणा आवश्यक आहेत हेंहि ठरवून त्याप्रमाणें सूचना करणें हें आमचें काम आहे. हल्लींच्या काळीं मोठमोठ्या वर्तमानपत्रांच्या कार्यालयांत विजेचीं दूरलेखनयंत्रें ठेवलेलीं असतात. अेका जागीं टाअिपरायटरवर मजकूर टाअिप केला म्हणजे दुसऱ्या जागीं तिकडील टाअिपरायटर विजेच्या साहाय्यानें आपोआप चालून मजकूर मुद्रित केला जातो. ही सोय सध्यां रोमन म्हणजे अिंग्रजी लिपिपुरती आहे. तीच सोय नागरीसाठीं देखील मिळवून द्यावयाची म्हणजे लिपींत विशेष फेरफार करावा लागेल. अक्षरांची संख्या कमी करून कांहीं खुणा वाढवाव्या लागतील. पण या लिपिपरिवर्तनांचा सामान्य जनतेशीं तसा संबंध येत नाहीं. दूरलेखन यंत्र वापरणाऱ्या कार्यालयांनाच ही दूरलेखन लिपि वापरावी लागणार व ती नागरीवरच आधारलेली असली पाहिजे.

आमच्या लिपिसुधारणासमितीचा कार्योद्देश वरीलप्रमाणें आहे. हा ध्यानांत घेअून खालील प्रश्नावलि तयार केली आहे. ज्या लोकांनीं या बाबतींत कमी अधिक विचार केला आहे त्यांना विनंति आहे कीं, त्यांनीं वरील अुद्देश ध्यानांत धरून आमच्या प्रश्नांचीं अुत्तरें देअून आमच्या कार्यांत आम्हांला मदत करावी. याप्रमाणें आलेल्या सर्व सूचनांचा विचार करून मगच आम्हीं आमच्या सूचना सरकारपुढें रुजूं करूं.

अनेक वर्तमानपत्रांतून या विषयाची चर्चा सुरू झाली आहे हें अिष्टच आहे. सर्व वर्तमानपत्रें आमच्या नजरेखालून जातीलच अशी खात्री नसल्यामुळें वर्तमानपत्रकारांना आमची विनंति आहे कीं, त्यांनीं या विषयावरील आपले लेख, चर्चापत्रें, आणि सूचना यांचीं कात्रणें पुढील पत्त्यावर पाठवून द्यावींत:—

**प्रा. न. रा. पारसनीस,**
मंत्री, लिपिसुधारणासमिति,
C/o गांधी स्मारकसंग्रह,
टाअुन हॉल, मुंबअी, १.

प्रश्नावलीचीं अुत्तरें १५ सप्टेंबरपर्यंत आमच्याकडे पोंचावींत. कारण त्या अुत्तरांचा विचार करून समितीला आपलें काम तीन महिन्यांच्या आंत पुरें करावयाचें आहे.

## प्रश्नावलि

१. नागरी अक्षरें छापतांना शिरोरेखा वापरतात. कित्येक लोक लिहितांना त्या गाळतात. गुजराती लिपीनें पूर्वी वापरांत असलेली शिरोरेखा सोडून दिली आहे. अशा स्थितींत :—

(१) शिरोरेखायुक्त,

(२) शिरोरेखारहित,

(३) व दोन्ही प्रकारांचीं अक्षरें विकल्पानें वापरणें,

या तीन प्रकारांतील कोणता विकल्प तुम्हांस मान्य आहे ?

[ नागरी अक्षरांना (१) शिरोरेखा असलीच पाहिजे अथवा (२) शिरोरेखा नसावीच, अथवा (३) शिरोरेखा विकल्पानें वापरण्या न वापरण्याची सूट असावी असे तीन पक्ष होतात. शिरोरेखा नेहमीं वापरणाऱ्यांना मधून मधून अेखादा शब्द, वाक्य किंवा लिखाणाचा कांहीं भाग अवतरण म्हणून निराळा दाखविण्यासाठीं अिंग्रजींतील 'अिटालिक' प्रमाणें शिरोरेखा विरहित अक्षरें वापरणें सोयीचें होतें. शिरोरेखा न वापरणाऱ्या लोकांना शिरोरेखायुक्त अक्षरें वापरणें सोयीचें होतें. यासाठीं तिसरा पक्ष स्वीकारून दोन्ही प्रकारांना किंवा शैलींना मान्यता द्यावी असें तुम्हांला वाटतें काय ? ]

शिरोरेखा काढून टाकल्यानंतर अक्षरांच्या सौंदर्यासाठीं कान्याच्या खालच्या बाजूला थोडा बाक देण्यांत येतो तो असावा किंवा नसावा हा अत्यंत गौण प्रश्न आहे. लिपि सुधारण्याशीं त्याचा सरळ संबंध नाहीं. म्हणून त्याविषयीं आम्हीं प्रश्न विचारला नाहीं.

२. छापतांना शिरोरेखा अजिबात काढून टाकण्याअैवजीं अक्षराच्या वरच्या टोंकावर थोडीशी आडवी रेघ ( SERIF ) देण्याची कल्पना तुम्हीं पसंत कराल का ? जसें :—

**स्वतंत्र भारत**

[ नागरी अक्षरें (१) शिरोरेखायुक्त (आकृति १ पहा), (२) शिरोरेखारहित आकृति ३ पहा) व (३) स्वल्प शिरोरेखासहित (आकृति २ पहा) अशा तिन्ही प्रकारांनीं नमुन्यांत दाखविलीं आहेत. त्यांपैकीं कोणचा अथवा कोणचे प्रकार आपल्याला मान्य आहेत तें अुत्तरांत स्पष्ट करावें. ]


३. शिरोरेखा गेल्या तर घ आणि ध; म आणि भ; आणि 'ख आणि र व' यांच्यामध्यें लिहितांना व वाचतांना घोटाळा होण्याचा जो संभव आहे तो टाळण्यासाठीं

**घ साठीं घ; भ साठीं भ**

हीं रूपें तुम्हांस मान्य आहेत का ?

४. ख आणि र व यामधील संदेह टाळण्यासाठीं मोडी, गुजराती आणि बिहारची कैथी या तीन लिपीमध्यें जीं निरनिराळीं अक्षरें वापरण्यांत येतात तीं जवळजवळ सारखींच आहेत. गुरुमुखी लिपींनें 'ष' अक्षराचें पोट तिरपें न फोडतां आडवें फोडून 'ख' तयार केला आहे. कित्येकांनीं 'र' चें शेंपूट अुचलून 'व' च्या तोंडांत देअून ख ची अशी अखंड आकृति करावी असें सुचविलें आहे. हे सर्व प्रकार खालीं दाखविले आहेत त्यांपैकीं आपणाला कोणचें रूप मान्य आहे अथवा याहून भिन्न असें दुसरेंच रूप आपण सुचवितां ?

कांहीं भाषांमध्यें 'क्ष' चा पुष्कळदां 'ख' होतो. (अुदा. क्षत्रिय–खत्री). हें ध्यानांत घेतां 'ख' च्या आकृतीमध्यें 'क्ष' च्या अक्षराशीं खालीलप्रमाणें थोडें बहुत साम्य असावें असें आपणांस वाटतें का ?




५. नागरी जोडाक्षरांमध्यें कित्येक जोडाक्षरांचे अवयव स्पष्ट ओळखले जातात. कित्येकाचे अवयव स्पष्ट ओळखले गेले तरी त्यांपैकीं हलन्त म्हणजेच प्रथम अवयव कोणता आणि अकारसहित द्वितीय अवयव कोणता याविषयीं भ्रम पडतो. आणि कित्येक अक्षरांचे तर अवयव आकृतीवरून ध्यानांतच येत नाहींत. अक्षरज्ञान करून देण्याच्या बाबतींत यामुळें पुष्कळ अडचण होते. ती दूर करण्यासाठीं जोडाक्षरांचा पुन्हां विचार होणें आवश्यक आहे.

जोडाक्षरामध्यें कित्येकांचे अवयव अेकाच्याखालीं अेक असे लिहिले जातात. छापण्याच्या दृष्टीनें हें अडचणीचें आहे. जोडाक्षरांचे पुष्कळ खिळे तयार करावे लागणें हीहि अेक अडचणीची बाब आहे. टाअिपरायटरवर असल्या अक्षरांना स्थान देणें जवळजवळ अशक्य होतें. या दृष्टीनें जे कांहीं फेरफार किंवा सुधारणा सुचवावयाच्या त्या लोकांना सहज पटतील आणि मुद्रणादि सर्व कामें सोपीं होतील याचा आग्रह असलाच पाहिजे. या दृष्टीनें खालील प्रश्न विचारले आहेत. यांतहि 'र' अक्षर असलेलीं जोडाक्षरें फारच अडचणीचीं आहेत त्यांच्यासाठीं निराळाच प्रश्न विचारला आहे.

नागरी लिपि शास्त्रशुद्ध करण्यांसाठीं जर आपण असा नियम केला कीं, नागरी लेखन अुच्चारानुसारी असावें म्हणजे जोडाक्षरांतील अवयव अेकाखालीं एक न लिहितां अुच्चाराप्रमाणें अेकापुढें एक लिहावेत, तर शुक्ल, रक्त, यासारखे शब्द शुक्ल, रक्त, असे लिहावे लागतील हा बदल आपणास योग्य वाटतो काय ?

६. वरील नियमानुसार रेफचा विचार—(कर्म, धर्म, पर्ण, कर्ण, कार्त्स्न्येन अि.) पुन्हा करावा लागेल. अुच्चाराप्रमाणें 'र' ज्या जागीं यावयास पाहिजे त्या जागीं सध्यां तो येत नाहीं. 'कार्त्स्न्येन' यामध्यें 'र' चा अुच्चार 'का' नंतर लगेच येतो. पण लिहिण्यांत त्, स्, न्, ये, अितक्या अक्षरांनंतर येतो. परिणाम असा होतो कीं, 'का' वाचल्यानंतर वरील रेफ शोधून मगच पुढील जोडाक्षर ध्यानांत घ्यावें लागतें. यापेक्षां 'का' च्या पुढें जर ' लिहिला तर अुच्चार सुकर होईल व '' साठीं रेफची आकृति गाळावयास हरकत अुरणार नाहीं. (का'त्स्न्येन, क'म, ध'म प'ण अि.)

रेफ ( ॅ ) साठीं र् ( अु० कर्म = कर्‌म ) अशी एक सूचना आहे, ती आपणांस विचारार्ह वाटते काय ?

७. याच नियमानुसार बाराखडींत येणारी ऱ्हस्व अिची आकृति ( ि ) अुच्चाराप्रमाणें अक्षराच्या नंतर यावयास पाहिजे. शक्ति या शब्दांत अुच्चाराप्रमाणें श, क्, त्, अि, असा क्रम आहे. तरी अुच्चाराप्रमाणें अि ची व्यवस्था व्हावी यासाठीं अि ला दुसरें रूप द्यावें काय ? रूप बदलावयाचें झाल्यास खालीलपैकीं तुम्हांस कोणतें पसंत आहे ? किंवा आपण निराळेंच अेखादें रूप सुचवूं शकतां काय ?

ऱ्हस्व ' इ ': अ॑ , अ॒ .       दीर्घ ' ई ': अी , अी .

८. आजच्या नागरी गुजराती लिपीमध्यें अनुस्वार, चंद्रबिंदु, अे, अै, ओ, औ ह्यांच्या मात्रा वगैरेंचे ठसे अक्षरांच्या डोक्यावर लिहितात, आणि अुकारांचीं दोन्हीं चिन्हें ु ू, ऋ काराचें चिन्ह ृ, ट्र काराचें चिन्ह ्र, नुख़ता ़, वगैरे ठसे व्यंजनाच्या खालीं लिहितात. त्यालाच 'तिमजली खिळे जुळवणी' (डिग्री कंपोजिंग) म्हणतात. मुख्य अक्षर मधल्या मजल्यांत असतें व काना, विसर्ग, अवग्रह व रु रू मध्यें येणारे अुकार हीं सर्व चिन्हें मधल्या मजल्यांतच येतात; दीर्घ ओकाराचें चिन्ह कोणच्याहि अक्षराच्या डोक्यावर चढून बसत नाहीं; ऱ्हस्व अि च्या वेलांटीची टोपी अक्षरांच्या डोक्यावर बसते. ही तिमजली खिळे जुळवणी फार त्रासाची व खर्चाची झाली आहे, आणि त्याशिवाय चिन्हें सरकल्यामुळें किंवा अुडाल्यामुळें मुद्रणामध्यें वेळोवेळीं अशुद्धता येते. हें टाळण्यासाठीं सगळीं चिन्हें मधल्या मजल्यांत आणावींत. मग तीं चिन्हें शिरोरेषेच्या वर डोकावतात कीं अक्षरांच्या पायथ्याच्या पुढें पाय पसरतात ही गोष्ट अडचणीची वाटणार नाहीं अशी सूचना केली गेली आहे. leg या अिंग्रजी शब्दांत l वरती गेला आहे तर g हा खालीं अुतरली आहे. तरीपण तिन्हींहि अक्षरें एकाच ओळींत जुळविलीं जातात. leg प्रमाणेंच जर नागरीची जुळवणी केली तर सगळ्या अडचणी दूर होतील. पण हा फेरफार अेकदम करावयाचा नाहीं म्हणून मधला व वरचा मजला कायम ठेवून दोन अुकार व ऋकार अेवढींच तीन चिन्हें जर मधल्या मजल्यांतील अक्षरांच्या पुढें लिहिलीं तर तें तुम्हांला पसंत आहे का ? याबाबत आकृति नं. ४ च्या खालीं अुदाहरण दिलें आहे त्याविषयीं आपला काय अभिप्राय आहे ?

९. लिपीचा विचार करण्यासंबंधीं नागरी अक्षरांचे कांहीं गट पाडले आहेत. ज्यांना काना नाहीं अशीं सर्व अक्षरें अुदा. ट, ठ, ढ, द, ड, ङ, ह, इ, ई, र, छ, ळ, ल हीं 'ट' गटांत मोडतात. ज्यांच्या पोटांत अुभी रेघ आहे अशी अक्षरें अुदा. क, फ, ऋ, झ, हीं 'क' गटांत मोडतात. ज्यांचे अवयव एकमेकांशीं जोडले नाहींत अशीं अक्षरें अुदा. ग, ण, श, ख हीं 'ग' गटांत येतात. 'व' गटांत बाकीचीं सर्व अक्षरें येतात. त्यांचा क्रम खालीलप्रमाणें लावतां येईल:—

व, ब, च, घ, ध, य, थ, प, ष, न, त, ल, ञ, म, भ, स, झ, ज, ञ, क्ष, ञ, ल.

यापैकीं ट गटांचीं जोडाक्षरें करतांना पुष्कळ अडचण भासते आणि पुष्कळ वेळां जोडाक्षर बनवितांना अेकाखालीं अेक अशीं अक्षरें लिहावीं लागतात. याच्याअैवजीं अक्षराला पायमोड चिन्ह लावून जर जोडाक्षर लिहिण्याचा प्रघात पाडला तर अक्षरें शिकणाऱ्यांची, खिळे जुळाऱ्यांची व मुद्रालेखकांची पुष्कळशी सोय होणार आहे. तर ही सुधारणा तुम्हांस मान्य आहे का? जसें:—राष्ट्‌र, विट्‌ठल, द्‌वारका.


१०. जोडाक्षराच्या शेवटीं जर य आला तर पाठीमागचे ट गटांतील अक्षर पायमोड न करतां 'य' चाच आकार कमी (पाअुण) केला जातो हें तुम्हांस पसंत आहे का? (विठ्या)

११. ज्या जोडाक्षरांच्या शेवटीं र येतो त्याच्या पाठीमागच्या अक्षरांत तिरकी रेघ काढून जोडाक्षर बनविलें जातें–क्र, प्र, द्र, ह्र,–यांच्यासाठीं नवीन टाअीप बनवावे लागतात तें टाळण्यासाठीं तुम्हीं कोणची सूचना करूं शकतां? क्‌र, प्‌र, द्‌र, ह्‌र असें लिहिलेलें तुम्हांस आवडेल का?

'र' बद्दल मोडी '𑘨' लिहिण्याचा प्रचार महाराष्ट्रांत थोडाफार झालेला आहे. त्या '𑘨' चा स्वीकार करून वरील जोडाक्षरें लिहिणें सोपें होअील असें तुम्हांस वाटतें का?

१२. मुद्रालेखनाच्या (टंकलेखनाच्या) दृष्टीनें नागरी अक्षरांची रुंदी एकसारखी ठेवून अक्षरसौंदर्य सांभाळण्याची जरूरी आहे. हा प्रश्न खरोखर लिपि सुधारण्याचा नसून हल्लींच्या मुद्रालेखन यंत्रांत बेढौल अक्षरें वापरलीं जातात त्याला आळा घालण्यासाठीं अुद्भवतो. म्हणून लिपीच्या सौंदर्यतज्ज्ञांना आमची अशी विनंती आहे कीं, त्यांनीं पूर्ण व अर्ध्या अक्षरांचीं सुंदर वळणें सुचवावींत व त्यांचे नमुने आमच्याकडे पाठवावेत.

१३. प्राचीन काळापासून स्वरांच्या आकृतींत हळूहळू फेरफार आले आहेत. अुदा० जुन्या काळीं —

'ओ' साठीं .

अशी आकृति वापरीत. आजच्या 'ॐ' च्या स्वरूपांत तें जुनें रूप टिकून आहे. 'ओ' चें तें जुनें रूप सोडून आपण चालू 'ओ' चालविला आहे.

त्यानंतर मोडी, गुजराती वगैरे कित्येक लिप्यामध्यें 'ए' 'ऐ' हीं रूपें सोडून 'अ' च्या वरच एक आणि दोन मात्रा (अे, अै) लिहिण्याचा प्रघात चालू झाला. जुन्या पोथ्यांतूनहि अशीं रूपें पहावयास सांपडतात.

त्याच न्यायानें इ, ई, उ, ऊ, याबद्दल अि, अी, अु, अू, असें लिहिण्याचा प्रघात महाराष्ट्रांत वाढत आहे. त्यालाच सर्वमान्य रूप देणें आपणांस पसंत आहे का?

मुंबअी सरकारनें राष्ट्रभाषेच्या प्रचारासाठीं हीं नवीं रूपेंच मान्य केलीं आहेत आणि हिंदी साहित्य संमेलनानें यांना पाठिंबा दिला आहे. या बाराखडीचा स्वीकार म. गांधींनीं देखील केला आहे. 'अ' च्या बाराखडीचा ब्लॉक आपल्या अवलोकनासाठीं पुढें दिला आहे. आकृति नं. ४ पहा.

यांतही अुच्चारानुसारी रूपाचा स्वीकार करावयाचा तर अि चें चिन्ह (ि)
प्र. ७ प्रमाणें बदलावें लागेल, तें आपणांस मान्य आहे का ?

१४. **आंकडेः**—सरकारी व्यवहारांतून आणि व्यापारी कंपन्यांच्या हिशोबांतून अिंग्रजीचा अुपयोग जसजसा बंद होत जाअील तसतसें देशांतील निरनिराळीं आंकडेवारीचीं पत्रकें आणि हिशेब अित्यादीसाठीं देशी आंकडे वापरावे लागतील. आज या आंकडयांत बारिक-सारिक भेद पुष्कळ आहेत. ते दूर करून सबंध हिंदुस्थानभर आंकडयांचीं रूपें अेकच प्रकारचीं वापरलीं गेलीं तर सर्वांची सोय होणार आहे. ह्या दृष्टीनें जर आंकडयांसाठीं आकृती नं. ४ मधील रूपें प्रमाणभूत आणि सर्वमान्य मानलीं व स्वीकारलीं तर तुम्हांस तीं मान्य होतील का ? अथवा यांपैकीं कोणच्या आंकडयाच्या आकृतींत फेरफार सुचवूं अिच्छितां ?

लिपिसुधारणासमितीचें काम तीन महिन्यांत पुरें करावयाचें आहे. म्हणून ह्या प्रश्नावलीचें अुत्तर शक्य तितक्या लवकर व सविस्तरपणें पाठविण्याची कृपा करावी. याबाबत फार पत्रव्यवहार करावा लागूं नये अेवढें पहावें.

**काका कालेलकर**,
अध्यक्ष, लिपिसुधारणासमिति,
टाअुन हॉल, मुंबअी, १.

**प्रा. न. रा. पारसनीस,**
संयुक्त मंत्री.

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व ळ

श ष स ह

ॐ क्ष श्र ज्ञ प्र

आकृति १

Bk Na 81—4

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न


प फ ब भ म

य र ल व ळ


श ष स ह

ॐ क्ष श्र ज्ञ प्र

आकृति २



आकृति ३




आकृति ४

श्री ॐ अ

ક ખ ગ ઘ ઙ

ચ છ જ ઝ ઞ

ટ ઠ ડ ઢ ણ

ત થ દ ધ ન

પ ફ બ ભ મ

ય ર લ વ ળ

શ ષ સ હ

ક્ષ જ્ઞ અ શ્ર પ્ર

૦ ૧ ૨ ૩ ૪

૫ ૬ ૭ ૮ ૯

आकृति ५

ક ખ ગ ઘ ઙ

ચ છ જ ઝ ઞ

ટ ઠ ડ ઢ ણ

ત થ દ ધ ન


પ ફ બ ભ મ

ય ર લ વ ળ

શ ષ સ હ

ક્ષ શ્ર જ્ઞ

आकृति ६




आकृति-७



आकृति ८

## परिशिष्ट २.

# लिपि सुधारणा समितीच्या प्रश्नावलीला उत्तर पाठविलेल्या व्यक्तींच्या नांवांची यादी.

| अनुक्रम नंबर व नांव. | | | पत्ता. |
|---|---|---|---|
| १. | सर रघुनाथ पु. परांजपे | ... | पुरुषोत्तमाश्रम, पुणें ४. |
| २. | बॅ. विनायक दा. सावरकर | ... | शिवाजी पार्क, मुंबअी २८. |
| ३. | श्री. ना. गो. चाफेकर | ... | बदलापूर, (ठाणें जि.) |
| ४. | ,, दाजी नागेश आपटे | ... | रावपुरा, बडोदें. |
| ५. | ,, श्री. दा. सातवळेकर | ... | आनंदाश्रम, पार्डी (सुरत). |
| ६. | रा. सा. र. ल. जोशी | ... | विकाराबाद, (हैद्राबाद दक्षिण). |
| ७. | ,, ब. म. का. कारखानीस | ... | डेक्कन जिमखाना, पुणें ४. |
| ८. | प्रो. गो. वि. तुळपुळे | ... | ५८०-अ, सदाशिव, पुणें २. |
| ९. | ,, का. वा. अभ्यंकर | ... | ९८१ सदाशिव, पुणें २. |
| १०. | श्री. मा. वि. किबे | ... | सरस्वती निकेतन, इन्दूर. |
| ११. | प्रा. वि. पां. बोकील | ... | २००/४ सदाशिव, पुणें २. |
| १२. | ,, कृ. पां. कुलकर्णी | ... | बांबुली निवास, लेडी जमशेटजी रोड, मुंबअी १६. |
| १३. | ,, श्री. रा. पारसनीस | ... | फर्ग्युसन कॉलेज, पुणें ४. |
| १४. | ,, रा. श्री. जोग | ... | ,, ,, |
| १५. | ,, शं. के. कानेटकर | ... | विलिंग्डन कॉलेज, सांगली. |
| १६. | श्री. पु. रा. लेले | ... | गिरगांव, मुंबअी ४. |
| १७. | ,, रा. दा. देसाई | ... | ५२२ सदाशिव, पुणें २. |
| १८. | ,, दि. वि. काळे | ... | संपादक—'सह्याद्रि', ५६८ नारायण, पुणें २. |
| १९. | ,, शं. रा. दाते | ... | संपादक—'काळ', २००/२ सदाशिव, पुणें २. |
| २०. | ,, दे. ना. टिळक | ... | नाशिक. |
| २१. | ,, कृ. के. कोल्हटकर | ... | पातंजल आरोग्य आश्रम, सातारा. |
| २२. | ,, के. ह. फणसळकर | ... | ८८२, सदाशिव, पुणें २. |
| २३. | डॉ. वा. व्ही. आठल्ये | ... | सरस्वतीसदन, सातारा. |
| २४. | ॲड. श्री. म. वर्दे | ... | ३२, खोतवाडी, गिरगांव, मुंबअी ४. |

| अनुक्रम नंबर व नांव. | | पत्ता. |
|---|---|---|
| २५. प्रि. का. रा. गुंजीकर | ... | १७, मॅथ्यूज् रोड, मुंबअी ४. |
| २६. श्री. सुंदरराव भास्कर वैद्य | ... | २३, भाअी जीवनजी लेन, मुंबअी २. |
| २७. डॉ. मा. चिं. लेले | ... | बाबाजी पुरा, बडोदें. |
| २८. ,, बा. मो. कानिटकर | ... | शिवाजीनगर, पुणें ५. |
| २९. ,, अेम्. डी. मनोहर | ... | २३, जयेन्द्र महाल, व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबअी १४. |
| ३०. श्री. शं. दा. चितळे | ... | अनाथ विद्यार्थीगृह, प्रकाशन, पुणें २. |
| ३१. ,, शं. बा. आंबेकर | ... | गुजरगल्ली, अहमदनगर. |
| ३२. ,, र. धों. कर्वे | ... | १३, भटवाडी क्रॉसलेन, मुंबअी ४. |
| ३३. ,, रा. म. क्षीरसागर | ... | विठ्ठलवाडी, हैदराबाद (द.). |
| ३४. ,, ए. बी. वालावलकर | ... | १२, बरोज लेन, मुंबअी २. |
| ३५. ,, मा. धों. कर्वे | ... | हिंगणें बुद्रुक, पुणें ४. |
| ३६. ,, डी. डी. गांगल | ... | लोकसंग्रह—६२४, सदाशिव, पुणें २. |
| ३७. ,, श्री. रा. टिटेकर | ... | सारस्वत बँक बिल्डिंग, मुंबअी ४. |
| ३८. ,, य. मो. नानल | ... | नौपाडा—ठाणें. |
| ३९. डॉ. रा. ग. हर्षे | ... | डेक्कन रिसर्च अिन्स्टिट्यूट, पुणें. |
| ४०. श्री. ना. ब. हुपरीकर | ... | सुलतान बझार, हैद्राबाद, दक्षिण. |
| ४१. सौ. कमलाबाअी किबे | ... | सरस्वती निकेतन, इंदूर. |
| ४२. ,, मालती बेडेकर | ... | मनुस्मृति, पुणें ४. |
| ४३. ,, गं. कोकीळ | ... | मुख्याध्यापिका, म. ल. गर्ल्स हायस्कूल, कोल्हापूर. |
| ४४. कु. सरोजनी बावर | ... | १९६/४ टिळक रोड, पुणें, २. |
| ४५. सौ. आनंदीबाअी शिर्के | ... | अनपट बंगला, पुणें ४. |
| ४६. डॉ. कु. तारादेवी मु. सोन्दे | ... | गिरगांव, मुंबअी ४. |
| ४७. प्रा. भवानीशंकर श्री. पंडीत | ... | श्रद्धानंद नगर, नागपूर. |
| ४८. ,, पु. शि. रेगे | ... | १४, हार्वे रोड, मुंबअी ७. |
| ४९. ,, अ. गं. मंगळूरकर | ... | ११९/६ सदाशिव, पुणें २. |
| ५०. प्रि. अेस्. आर्. तावडे | ... | सेकंडरी टीचर्स ट्रेनिंग कॉलेज, बेळगांव. |
| ५१. ,, ल. नी. छापेकर | ... | प्राथमिक अध्यापक विद्यालय, चाळिसगांव. |

| अनुक्रम नंबर व नांव. | | पत्ता. |
|---|---|---|
| ५२. प्रि. स. रा. भट | ... | म. ताराबाओी टीचर्स ट्रेनिंग कॉलेज, कोल्हापूर. |
| ५३. श्री. रा. स. भागवत | ... | सखाराम भुवन, ठाणें. |
| ५४. डॉ. पु. वि. बापट | ... | स्वाध्याय, पुणें ४. |
| ५५. प्रा. य. र. आगाशे | ... | अहमदनगर कॉलेज, अहमदनगर. |
| ५६. ,, श्या. मा. कुलकर्णी | ... | ,, |
| ५७. ,, द. गं. कोपरकर | ... | ,, |
| ५८. श्री. या. श्री. अणे | ... | वणी (वऱ्हाड). |
| ५९. ,, मो. रा. जोशी | ... | राजवाडे संशोधन मंदिर, धुळें, |
| ६०. ,, भा. रं. कुळकर्णी | ... | ,, |
| ६१. ,, गिडवानी आय्.सी.अेस्. | ... | सेक्रेटेरिअट, मुंबओी. |
| ६२. प्रि. नी. शं. नवरे | ... | ट्रेनिंग कॉलेज, पनवेल. |
| ६३. ॲड. न. बा. देशमुख | ... | अहमदनगर. |
| ६४. श्री. र. गो. भावे | ... | पेण. |
| ६५. ,, श्री. ग. मणेरीकर | ... | दत्तात्रय सदन, अलिबाग. |
| ६६. ,, व. ग देवकुळे | ... | चित्रशाळा, १०२६ सदाशिव, पुणें २. |
| ६७. ,, वा. वि. साठे | ... | चालक : मोहन मुद्रणालय, ४०० शनिवार, पुणें २. |
| ६८. ,, ज. स. कानेटकर | ... | कर्नाटक प्रेस, शीव, मुंबओी नं. २२. |
| ६९. ,, रा. वि. मतकरी | ... | स्लीटर रोड, मुंबओी ७. |
| ७०. ,, द. वा. जोग | ... | २६०/२ सदाशिव, पुणें २. |
| ७१. प्रा. शि. का. सन्त | ... | व्ही. जे. अिन्स्टिट्यूट, मुंबओी. |
| ७२. ,, दु. का. सन्त | ... | विद्याभवन कॉलेज, अन्धेरी. |
| ७३. श्री. चिं. ग. काशीकर | ... | वैदिक संशोधन मंदिर, पुणें २. |
| ७४. ,, चिं. ग. कर्वे | ... | २०४ वाघवाडी, पुणें २. |
| ७५. ,, गं. आ भागवत | ... | C/o ऑनेस्टी कंपनी, बुधवार, पुणें २. |
| ७६. ,, बा. श्री. कोल्हटकर | ... | शिवाजीनगर, पुणें ५. |
| ७७. प्रा. म. ना. अदवंत | ... | जळगांव, मुळजीजेठा, कॉलेज. |
| ७८. श्री. स. भा. पाटील | ... | अेम्. अेल्. सी. जळगांव. |
| ७९. ,, ग. ह. तारळेकर | ... | मुळजी जेठा कॉलेज, जळगांव. |

| अनुक्रम नंबर व नांव. | | पत्ता. |
|---|---|---|
| ८०. श्री. वा. वा. मेहेंदळे | ... | ॲड्. ऑफिसर, म्यू. स्कूल, जळगांव. |
| ८१. ,, बा. ग. शिंपी | ... | ॲसि. डे. अेज्यु. अिन्स्पेक्टर, जळगांव. |
| ८२. ,, देवकीनंदन नारायण | ... | अध्यक्ष पू. खा. जिल्हा कॉंग्रेस कमिटी, जळगांव. |
| ८३. ,, सातपुते | ... | ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर जिल्हा स्कूलबोर्ड, जळगांव. |
| ८४. ,, बा. वि. गंधे | ... | मुख्याध्यापक सार्वजनिक हायस्कूल, जळगांव. |
| ८५. ,, रा. ज. कोल्हटकर | ... | बाळकृष्ण सदन, गोखले रोड, नॉर्थ दादर, (मुंबअी १४). |
| ८६. ,, रा. ग. देसाअी | ... | घोडबंदर रोड, बांद्रा. |
| ८७. ,, अनंत टी. पाठक | ... | राममूर्ति रस्ता, मुंबअी १४. |
| ८८. प्रि. अेल्. अेस्. पांढरीपांडे | ... | बिंझानी सिटी कॉलेज, नागपूर. |
| ८९. श्री. वा. धों. गुर्जर | ... | तरुणभारत प्रेस, बेळगांव. |
| ९०. ,, द. व्यं. पै | ... | ५ शैलावर्त, कांदिवली. |

---

## पुढील व्यक्तींनीं आपल्या संस्थांच्यातर्फे अुत्तरें पाठविलीं.


| | | |
|---|---|---|
| १. श्री. वि. अ. पटवर्धन | ... | अध्यक्ष, प्रेस ओनर्स ॲसोसिअेशन्, पुणें ४. |
| २. ,, क. ला. मुनोत | ... | चिटणीस, महाराष्ट्र मुद्रण परिषद्, पुणें २. |
| ३. प्रा. वा. दा गोखले | ... | चिटणीस, महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें २. |

परिशिष्ट ३

# समितीनें सुचविलेल्या अक्षरांच्या आकृति




आकृति नं. १– बालबोध लिपींतील सुधारलेली शिरोरेखासहित अक्षरें (व्यजनें).



आकृति न. २

सुधारलेली शिरोरेखासहित 'अ' ची बाराखडी.

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म


य व र ल ळ

श ष स ह

क्ष ज्ञ श्र ॐ

आकृति नं. ३

(अल्परेखासहित) सेरिफवाली अक्षरों (व्यंजनें).



आकृति नं. ४
सेरिफवाली ' अ ' ची बाराखडी.

ક ખ ગ ઘ ઙ

ચ છ જ ઝ ઞ

ટ ઠ ડ ઢ ણ

ત થ દ ધ ન

પ ફ બ ભ મ

ય વ ર લ

શ ષ સ

હ ળ ક્ષ જ્ઞ શ્ર

**आकृति नं. ५**


सुधारलेली शिरोरेखारहित गुजराती अक्षरें ( व्यंजनें ) [ नागरी वळण ].

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ક | ખ | ગ | ઘ | ઙ |
| ચ | છ | જ | ઝ | ઞ |
| ટ | ઠ | ડ | ઢ | ણ |
| ત | થ | દ | ધ | ન |
| પ | ફ | બ | ભ | મ |
| ય | ર | લ | વ | ળ |
| શ | ષ | સ | હ | ૐ |
| ક્ષ | જ્ઞ | અ | શ્ર | પ્ર |
| ૦ | ૧ | ૨ | ૩ | ૪ |
| ૫ | ૬ | ૭ | ૮ | ૯ |

**आकृति नं. ६**


सुधारलेलीं गुजराती शिरोरेखारहित अक्षरें (व्यंजनें) आणि आंकडे

[ गुजराती वळण ]



आकृति नं. ७

सुधारलेली गुजराती शिरोरेखारहित ' अ ' ची बाराखडी.




BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.